वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट
VSI संशोधनेन संवृद्धिः
ISO 9001:2015
★ सुवर्ण महोत्सवी वर्ष ★ ५०

दूरध्वनी : +९१ (०२०) २६९०२१००
थेट : +९१ (०२०) २६९०२२११ / १०३
ईमेल : skadupatil@vsisugar.org.in
dgvsipune@gmail.com
वेबसाईट : www.vsisugar.com

मांजरी (बुद्रुक), ता. हवेली, जि. पुणे : ४१२ ३०७
महाराष्ट्र, भारत

संभाजी कडूपाटील आय.ए.एस. (निवृत्त)
महासंचालक

व्हीएसआय/डीजी/ॲग्री/ N° 04993 /२०२६-२७ दिनांक: १०.०८.२०२६

प्रति,
मा. कार्यकारी संचालक

विषय : ऊस रोपवाटिका तंत्रज्ञान व व्यवस्थापन प्रशिक्षणाबाबत....

महोदय,

महाराष्ट्रात ऊस उत्पादन व साखरेचा उतारा वाढविण्यासाठी उत्तम प्रतीचे दर्जेदार बेणे, निरोगी रोपे आणि आधुनिक लागवड तंत्रज्ञानाचा अवलंब करणे अत्यंत आवश्यक आहे. बदलते हवामान, वाढता उत्पादन खर्च, दर्जेदार ऊस बेण्याची मर्यादित उपलब्धता आणि अधिक उत्पादनाची वाढती गरज लक्षात घेता एक डोळा ऊस रोप निर्मिती तंत्रज्ञान हे अत्यंत उपयुक्त, किफायतशीर व परिणामकारक ठरत आहे.

**वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट (VSI), पुणे** यांच्या वतीने **'ऊस रोपवाटिका तंत्रज्ञान व व्यवस्थापन'** या विषयावर **तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम** ऑगस्ट, २०२६ पासून नियोजित आहे. प्रशिक्षणामध्ये एक डोळा रोप निर्मितीची संपूर्ण प्रक्रिया, रोपवाटिका व्यवस्थापन, रोगमुक्त व दर्जेदार रोपे तयार करण्याच्या पध्दती आणि आधुनिक लागवड तंत्रज्ञान याविषयी व्याख्यान व प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे सविस्तर माहिती दिली जाणार आहे.

साखर कारखान्यांच्या ऊस विकास विभागातील अधिकारी व कर्मचारी तसेच ऊस रोपवाटिका सुरू करू इच्छिणारे नवीन उद्योजक व शेतकरी यांना याचा फायदा होणार असून कारखाना कार्यक्षेत्रात दर्जेदार ऊस बेणे तसेच एक डोळा ऊस रोपे उपलब्ध होणार आहेत तसेच सुधारित वाणांचा प्रसार होऊन ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या उत्पादन वाढीस चालना मिळेल पर्यायाने ऊस कारखान्यास नियमित ऊस पुरवठा होईल.

**सदर प्रशिक्षणासाठी प्रति व्यक्ती प्रशिक्षण शुल्क रु. ५,००० /- (रु. पाच हजार फक्त) असणार आहे.** अधिक माहितीसाठी डॉ. अशोक कडलग (मो. न. ८२७५०३३८२३) आणि डॉ. समाधान सुरवसे (मो. न. ९८६०८७७०४९) यांना संपर्क करावा.

कळावे,

आपला स्नेहांकित,

(संभाजी कडूपाटील)